# Central Post

Rotary

Rotary Club of Ahmednagar Central



## UNITE FOR GOOD



Director WINS
Director Bulletin Editor
**Rtn. Sujata Katariya**



**President**
Rtn. Sunil Katariya

RID 3132

CLUB ID : 26235

Official Bulletin –
**Issue No. 3**



**Secretary**
Rtn. Amar Gurap

Rotary Year 2025–26

Rotary | UNITE FOR GOOD

Rotary Club of Ahmednagar Central

RID 3132 Club No. 26235 RI Year 2025-26

Edition -03 | Dt. 1 August to 15 August 2025

# जागतिक स्तनपान सप्ताह – जनजागृती कार्यक्रम

**दिनांक: 01 ऑगस्ट 2025**
**स्थळ: बाळासाहेब देशपांडे रुग्णालय, अहिल्यानगर**

जागतिक स्तनपान सप्ताह निमित्ताने रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, अहिल्यानगर महानगरपालिका, आणि अहमदनगर अकॅडमी ऑफ पीडियाट्रिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 01 ऑगस्ट 2025 रोजी बाळासाहेब देशपांडे रुग्णालय, अहिल्यानगर येथे जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून आदरणीय यशवंतजी डांगे, आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात स्तनपानाचे बालकांच्या पोषण, रोगप्रतिकारक शक्ती आणि आई-बाळ नात्याच्या दृढीकरणासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले. तसेच, त्यांनी समाजात या विषयावर व्यापक जनजागृती करण्याची गरज व्यक्त केली आणि आयोजकांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते
डॉ. श्री सतीश राजुरकर, वैद्यकीय अधिकारी, अहिल्यानगर महानगरपालिका
डॉ. जयंत देशमुख
रोटेरियन सुनिल कटारिया, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल
रोटेरियन अमर गुरप सचिव
रोटेरियन डॉ. उज्चला शिरसाठ
रोटेरियन डॉ. नीलिमा बागल
रोटेरियन डॉ. दिलीप बागल
रोटेरियन माधुबाला चोरडिया, अध्यक्षा, इनरव्हील क्लब

इतर उपस्थित रोटेरियन सदस्यांमध्ये विनोदभाई बोरा, सुनील मुथा, संजय मुनोत, वसंत मुनोत, आणि भंडारी यांचा समावेश होता.

या कार्यक्रमात बाळासाहेब देशपांडे रुग्णालयातील परिचारिका, अहिल्यानगर महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी, विखे पाटील फाउंडेशनचे डॉक्टर व परिचारिका, रुग्ण व त्यांचे नातेवाईक, तसेच अहिल्यानगर परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमात दिलेल्या प्रमुख मार्गदर्शनपर भाषणांमध्ये
डॉ. उज्चला शिरसाट (बालरोगतज्ञ) – यांनी बालकांच्या आरोग्यासाठी पहिल्या सहा महिन्यांत केवळ स्तनपानाचे महत्त्व सांगितले.
डॉ. नीलिमा बागल (स्त्रीरोगतज्ञ) – यांनी स्तनपानातील अडचणी, मातांची काळजी आणि सहकार्य यावर मार्गदर्शन केले.
डॉ. श्रेया खजगीवाले (BAMS) – यांनी प्रसूतीनंतरच्या काळातील आहार, विश्रांती आणि स्तनपानातील टिप्स सांगितल्या.
आयुक्त यशवंतजी डांगे – यांनी समाजात आरोग्य विषयक जनजागृती करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाची सुरुवात रोटेरियन सुनिल कटारिया (अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल) यांच्या प्रास्ताविकाने झाली. कार्यक्रमाचा समारोप रोटेरियन अमर गुरप (सचिव) यांनी दिलेल्या आभारप्रदर्शनाने झाला.

हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला असून, "स्तनपान: जीवनाची भक्कम पायाभरणी" हा जागतिक संदेश स्थानिक पातळीवर प्रभावीपणे पोहोचवण्यात organizers यशस्वी ठरले.


स्तनपानाबाबत व्यापक जनजागृतीची गरज : आयुक्त डांगे

रोटरी क्लबच्यावतीने जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह




सिटीझन

जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेन्ट्रल तर्फे संपन्न

07 Aug 2025 - Page 2 | epaper.shrigondacitizen.com


समाचार

जागतिक स्तनपान जनजागृती सप्ताह रोटरी सेन्ट्रलतर्फे साजरा

**स्व. श्री माणकचंद पुखराज कटारिया (जन्म जयंती निमित्ताने) व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने वैद्यकीय शिबिराचे आयोजन आज दिनांक 2,ऑगस्ट 2025 ही संपूर्ण सामाजिक उपक्रमगाथा हे त्यांचे जीवनकार्य, मूल्यं आणि समाजसेवेप्रती असलेल्या निष्ठेचे स्मरणरुप आहे.**

**समाजाच्या आरोग्य व कल्याणासाठी ही एक नम्र श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. रो सुनील कटारिया= अधक्ष**

**स्थळ: आनंदऋषिजी हॉस्पिटल**



**4 नगर टाइम्स**

# आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपते

## रोटरीचे अध्यक्ष सुनील कटारिया । १२५ रुग्णांची मोफत मेंदू विकार तपासणी

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्यसेवेतून माणुसकी धर्म जपला जात आहे. येणाऱ्या रुग्णांकडे माणुसकीच्या भावनेने पाहून त्याच्या जीवनातील वेदना दूर करण्याचे काम हे आरोग्य मंदिर करत आहे. आचार्य श्री आनंदऋषीजींच्या जयंतीनिमित्त आरोग्य सेवेच्या महायज्ञाचे कुंड प्रज्वलीत झाले असून, यामध्ये सेवा देण्यासाठी अनेकांचे हात पुढे आले असून, या महायज्ञातून अनेक गरजू रुग्णांना आधार मिळणार असल्याची भावना रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहिल्यानगरचे अध्यक्ष सुनील कटारिया यांनी व्यक्त केली.



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त स्व. माणकचंदजी पुखराज कटारिया यांच्या जन्म दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहिल्यानगरच्या माध्यमातून मेंदू विकार व मेंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी सुनील कटारिया बोलत होते. यावेळी सचिव अमर गुरप, डॉ. शिरीष कटारिया, वसंत मुनोत, विनोद भंडारी, चंद्रकलाबाई कटारिया, संजय कटारिया, सुजाता कटारिया, राजश्री चंगेडिया, संजय मुनोत, करुणा कटारिया, न्युरोलॉजी डॉ. गौतम काळे, डॉ. अद्वैत गीते, डॉ. वैशाली कदम, संतोष बोथरा, सतीश लोढा, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी आदी उपस्थित होते.

पुढे सुनील कटारिया म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णसेवेतून ईश्वरसेवा सुरु आहे. या मानवतेच्या सेवा कार्यात कटारिया परिवारचे व रोटरीचे नेहमीच सहकार्य राहणार आहे. हॉस्पिटलच्या सेवा कार्यामुळे जिल्ह्याचे नाव भारतभर झाले असून, वैद्यकीय क्षेत्रात एक आदर्श निर्माण झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. अद्वैत गीते म्हणाले की, मेंदूवरील खर्चिक उपचारासाठी लाखो रुपये लागतात. मात्र आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अल्पदरात ही सेवा दर्जेदार पध्दतीने मिळत आहे. तीन मेंदू विकार तज्ञ हॉस्पिटलमध्ये कार्यरत असून, अद्यावत तंत्रज्ञान सुविधांचा लाभ रुग्णांना दिला जात आहे. डॉ. गौतम काळे यांनी मेंदूवरील विविध थेरपी, उपचार, डोकेदुखी, जेबीएस, पॅरालिसिस, स्मृतीभंश व डोक्यांचे दुर्मिळ आजारावर हॉस्पिटलमध्ये उपचार उपलब्ध असून, तज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून अनेक रुग्ण बरे होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या शिबिरात १२५ रुग्णांची मोफत मेंदू विकार तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

**Gratitude Message**

**Award Ceremony – " *Vijayostav " Organized by PDG Rtn. Dr. Suresh Saboo Sir – Rotary District 3132 Venue: Jalna City | Date: 03.08.2025**

With immense pride and heartfelt gratitude, I wish to express my sincere thanks to Past District Governor Rtn. Dr. Suresh Saboo Sir and his entire organizing team for hosting the grand event "Vijayostav" in Jalna on 3rd August 2025.This inspiring program celebrated the dedication and success of Rotarians across District 3132. We were honored by the gracious presence of dignitaries including PDG Rtn. Shirish Rayate Sir, Vaishali Vahini, Dr. Shrikrishna Joshi, Vaiju Vahini, Prasanna, Shreya Vahini, Rtn. Sunil Katariya, Sujata Bhabi, Dr. Kunal, Dr. Kirti, Ishwar, Minal Bhabi, Sneha, and myself, Rtn. Amar Gurap.

The highlight of the ceremony was the recognition of remarkable contributions:

Mr. & Mrs. Dr. Joshi – Felicitated for their generous commitment as Major Donors

Rtn. Prasanna – Awarded Best Assistant Governor in the entire district

Rtn. Dr. Kunal – Awarded Best President – Zone C

Rtn. Sunil Katariya – Awarded Best Secretary – Zone C

Rotary Club of Ahmednagar Central – Honored with awards in 11 different avenues

Rtn. Minal Bhabi – Honored as Best Lady Rotarian

Her club was recognized in 7 avenues of service

These awards represent the collective victory of our club – a result of the dedication, teamwork, and active participation of all our Rotarians.I express heartfelt gratitude to PDG Dr. Suresh Saboo Sir and his team for such a memorable and well-organized event. All participants thoroughly enjoyed the celebration and left with renewed motivation for the upcoming Rotary year.Let us continue this momentum and strive together for even greater success in Rotary Year 2025-26.With Rotary Regards,

Rtn. Amar Gurap Secretary – Rotary Club of Ahmednagar Central* Rotary Year 2025-26






Rotary | UNITE FOR GOOD

Rotary Club of Ahmednagar Central

RID 3132 Club No. 26235 RI Year 2025-26

Edition -03 | Dt. 1 August to 15 August 2025

# सन्मान सोहळा – आजचा गौरवाचा क्षण

आज रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल च्याअध्यक्ष, सचिव तसेच रोटेरियन सदस्यांचाआदरपूर्वक सत्कार करण्यात आला,आमदार श्री. संग्राम भय्या यांच्या शुभहस्ते
रोटरी क्लबच्या समाजोपयोगी सेवा प्रकल्पांबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.या गौरवामुळे सर्व सदस्यांना नवे बळ व प्रेरणा लाभली आहे.रोटरीच्या Service Above Self या तत्त्वानुसार आमचे कार्य असंच निरंतर सुरु राहील.– रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल



---

इन्व्हर्टर बॅटरी सेट हा प्रकल्प महिला मंडळ बालक मंदिर, दिल्ली गेट, अहिल्यानगर येथे पूर्ण आज दिनांक_5/08/2025 ,11/15 वाजता, शाळेमध्ये इन्व्हर्टर व बॅटरीचा पूर्ण सेट याचे इंस्टॉलेशन प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण झाले हा उपक्रम रोटरी क्लबच्या सहकार्याने पार पडत असून,रो निलेश शहा यांचं योगदान उल्लेखनीय रो सुनील कटारिया,रो अमर गुरप, ,PDG शिरीष रायते ,गिरीश मुळे, सौ गौरी मुळे,संजय मुनोत ,सुनील मुथा ,वसंत मुनोत ,प्रसन्न खाजगीवाले,मनीष बोरा,विनोद भंडारी हे सर्व सदस्य उपस्थित होते या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सुळ,संस्थेच प्रवर्तक व शाळेतील सर्व शिक्षक वृद विशेष उपस्थिती – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलरो सुनील कटारिया अध्यक्ष,रो अमर गुरप सचिव रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल अहमदनगर






# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलतर्फे 'रिमांड होम'मध्ये रक्षाबंधन

**दै. अहमदनगर घडामोडी**

**अहिल्यानगर । प्रतिनिधी –**
देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे या उक्तीप्रमाणे आणि रोटरीचे घोषवाक्य Service Above Self सर्व्हिस अबाऊ सेल्फ यानुसार रोटरी क्लबच्या सदस्यांनी दातृत्वाचे सुंदर उदाहरण घडवले.

कार्यक्रमासाठी रो.मनोज चंगेडिया गहू गोणी ५, तेल डबा १, मुलींसाठी कॉस्मेटिक्स, मेंहदी कोन व इतर साहित्य, रो.निवृत्ती झिने खाऊ साहित्य, रो.विनोद बोरा सफरचंद पेटी, रो.राजेश परदेशी राख्या, रो.हरीश पेमदाणी एक तेल डबयाचे योगदान दिले.

सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहून आपली सेवा दिली.

यावेळी पीडीजी रो. शिरीष रायते सर, रो. ईश्वर बोरा,रो. विनोद बोरा, रो.निवृत्ती झिने, रो.मनोज चंगेडिया,

रो.राजेश परदेशी, रो. संजय मुनोत, रो. अजय गांधी, रो. विजय जुंदरे, रो. अमृत कटारिया, रो. नरेंद्र चोरडिया, रो. सुजाता कटारिया, रो. मनीष बोरा,अँन्स नीलम परदेशी, साजरी परदेशी, रिमांड होम संस्थेचे सचिव फातिमा मॅडमसर्व शिक्षक व मदतनीस विद्यार्थी व विद्यार्थिनी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरुन बोलताना रो.सुनील कटारिया यांनी सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. व म्हणाले की, हा सण फक्त भाऊ बहिणीच्या नात्याचा नाही, तर प्रेम, विश्वास आणि संरक्षणाच्या वचनाचा उत्सव आहे. राखी ही फक्त दोऱ्याची गाठ नसून, मनांना जोडणारी भावनिक नाळ आहे.

स्वतःवर विश्वास ठेवा, शिक्षणाला प्राधान्य द्या, आपल्या स्वप्नांचा पाठलाग करा. जशी राखी जबाबदारीची जाणीव करून देते, तशीच तुम्हीही समाजात आपले स्थान निर्माण करा. रोटरी क्लब नेहमीच तुमच्या पाठीशी आहे असे सांगितले.

मनोगत व्यक्त करतांना पीडीजी रो. शिरीष रायते सर म्हणाले की हा उपक्रम गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ रोटरी सेंट्रल सातत्याने राबवत आहे.

फातिमा यांनी रिमांड होम संस्थेच्या वतीने रोटरी क्लबच्या सातत्यपूर्ण मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रो.ईश्वर बोरा यांनी सर्वांचे आभार मानले.

**समाचार**



## रोटरी सेंट्रलतर्फे रिमांडहोममध्ये रक्षाबंधन

**समाचार/नगर-दि.११**
देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे या उक्तीप्रमाणे आणि रोटरीचे घोषवाक्य सर्व्हिस अबाऊ सेल्फ यानुसार रोटरी क्लबच्या सदस्यांनी दातृत्वाचे सुंदर उदाहरण घडवले.

कार्यक्रमासाठी रो.मनोज चंगेडिया गहू गोणी ५, तेल डबा १,मुलींसाठी कॉस्मेटिक्स,मेंहदी कोन व इतर साहित्य,रो.निवृत्ती झिने खाऊ साहित्य,रो.विनोद बोरा सफरचंद पेटी, रो. राजेश परदेशी राख्या,रो.हरीश पेमदाणी एक तेल डबयाचे योगदान दिले.

यावेळी पीडीजी रो. शिरीष रायते, रो. ईश्वर बोरा,रो. विनोद बोरा,रो.निवृत्ती झिने, रो.मनोज चंगेडिया, रो.राजेश परदेशी,रो. संजय मुनोत,रो. अजय गांधी,रो. विजय जुंदरे, रो. अमृत कटारिया,रो. नरेंद्र चोरडिया, रो. सुजाता कटारिया, रो. मनीष बोरा,अँन्स नीलम परदेशी, साजरी परदेशी, रिमांड होम संस्थेचे सचिव फातिमा सर्व शिक्षक व मदतनीस विद्यार्थी व विद्यार्थिनी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.अध्यक्षस्थाना वरुन बोलताना रो. सुनील कटारिया यांनी सर्वांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.व म्हणाले की,हा सण फक्त भाऊ बहिणीच्या नात्याचा नाही,तर प्रेम,विश्वास आणि संरक्षणाच्या वचनाचा उत्सव आहे. राखी ही फक्त दोऱ्याची गाठ नसून, मनांना जोडणारी भावनिक नाळ आहे. रो.ईश्वर बोरा यांनी आभार मानले.

11 Aug 2025 - Page 5

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक **रयत समाचार** epaper.rayatsamachar.com 2_CITY_PAGE 12 Aug 2025



## रिमांड होममध्ये रक्षाबंधन उत्साहात

### रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचा उपक्रम

**अहमदनगर । आबीद खान**
''देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे'' या उक्तीप्रमाणे आणि या रोटरीच्या घोषवाक्यानुसार, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलतर्फे रिमांड होममध्ये रक्षाबंधनाचा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमासाठी मनोज चंगेडिया यांनी ५ गोण्या गहू, १ डबा तेल, मुलींसाठी सौंदर्यप्रसाधने, मेहंदी कोन व साहित्य दिले. निवृत्ती झिने यांनी खाऊ साहित्य, विनोद बोरा यांनी सफरचंद पेटी, राजेश परदेशी यांनी राख्या, तर हरीश पेमदाणी यांनी १ डबा तेल दिला. सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहून आपली सेवा दिली. कार्यक्रमास पीडीजी शिरीष रायते, ईश्वर बोरा, विनोद बोरा, निवृत्ती झिने, मनोज चंगेडिया, राजेश परदेशी, संजय मुनोत, अजय गांधी, विजय जुंदरे, अमृत कटारिया, नरेंद्र चोरडिया, सुजाता कटारिया, मनीष बोरा, नीलम परदेशी, साजरी परदेशी, रिमांड होम संस्थेच्या सचिव फातिमा मॅडम, सर्व शिक्षक, मदतनीस तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना सुनील कटारिया म्हणाले की, रक्षाबंधन हा सण फक्त भाऊबहिणीच्या नात्याचा नसून प्रेम, विश्वास व संरक्षणाच्या वचनाचा उत्सव आहे. राखी ही फक्त दोऱ्याची गाठ नसून मनांना जोडणारी भावनिक नाळ आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, शिक्षणाला प्राधान्य द्या व आपल्या स्वप्नांचा पाठलाग करा. रोटरी क्लब नेहमीच तुमच्या पाठीशी उभा आहे. मनोगत व्यक्त करताना पीडीजी शिरीष रायते यांनी सांगितले की, हा उपक्रम रोटरी सेंट्रलकडून गेल्या ३० वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे. श्रीमती फातिमा यांनी संस्थेच्या वतीने रोटरी क्लबचे आभार मानले. कार्यक्रमाचे आभार ईश्वर बोरा यांनी मानले.

# Civil Hospital Ahilyanagar

**12th August 2025 – International Youth Day & Organ Donation Awareness**



**On the occasion of International Youth Day and to promote the importance of Organ Donation, a Cycle Rally was jointly organised by Civil Hospital Ahilyanagar, Rotary Club of Ahmednagar Central, Red Ribbon Club, and other associated organisations.**

**The rally commenced from Civil Hospital and covered various parts of Ahilyanagar city, spreading the message of health, youth empowerment, and organ donation awareness.**



**With great enthusiasm and active participation, the program was successfully completed.**

लोकमत



जानकी कवडे प्रशालेत ध्वजारोहण करताना ॲड. अभिजित कोठारी. समवेत डॉ. स्वप्ना वाळके, राजवी मुळे, सुनील कटारिया, वसंत मुनोत, सुनील मुथा, नंदकुमार लोणकर. सृष्टी थोरात, डॉ. कुणाल कोल्हे, सिराज खान, राज कवडे, सुलभाताई वाळके.

# जानकी कवडे प्रशालेत स्वातंत्र्य दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर :** नागरदेवळे येथील स्वातंत्र्यसैनिक जानकी कवडे प्रशालेत ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ॲड. अभिजित कोठारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर सेंट्रलचे अध्यक्ष सुनील कटारिया यांच्या अध्यक्षतेखाली सर्व सदस्य यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. कुणाल कोल्हे, वसंत मुनोत, सुनील मुथा, संस्थेचे सचिव अभिनंदन वाळके, डॉ. स्वप्ना वाळके-कोठारी, श्वेता मुळे, सुलभाताई वाळके, राजवी मुळे, प्रशालेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र कवडे, संचालिका राज कवडे, कुणाल पांढरे, अझहर सय्यद व रंगनाथ जोशी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. पाऊस सुरू असतानाही प्रशालेतील चिमुकल्यांनी बहारदार देशभक्तीपर गीते सादर केली. प्रास्ताविक मुख्याध्यापक नंदकुमार लोणकर यांनी, तर सूत्रसंचालन उज्ज्वला घावटे यांनी केले. दीपक पंडित यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुनंदा जावळे, सिराज खान, गणेश कवटे, स्वयंप्रभा खंडागळे, मुबीना काझी, तबसुम शेख, स्वीटी जोशी आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांची पारितोषिकेही प्रदान करण्यात आली. मिठाईवाटपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

Ahmednagar Main
Page No. 2 Aug 17, 2025
Powered by: erelego.com